IMPACT FACTOR 5.473(SJIF)
**UPA NATIONAL E-JOURNAL**
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*
ISSN 2455-4375

# कृषी विषयक कल्याणकारी कार्यात वर्धा जिल्हयातील महिलांचे योगदान : एक ऐतिहासिक सिंहावलोकन

**प्रा.डॉ. तिर्थनंदन रामचंद्रराव बन्नगरे**
इतिहास विभाग प्रमुख
स्व. वसंतराव कोल्हटकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रोहणा
Email Id - tirthananad1234@gmail.com
Mob. No. 9822091059

---

***सारांश (Abstract) :***

*भारतीय संविधानाने महिलांना राजकीय नागरी हक्क प्रदान केल्याने त्या मतदार म्हणूनही स्त्रीया अधिक जबाबदारीने वागतात. देशातील महिला राजकीय सक्षमीकरणाचे बाबतीत ७८ व्या स्थानावर पोहोचलेल्या आहे. ही संधी साधत वर्धा जिल्हयातील महिलांनी राजकीय क्षेत्रात उडी घेवून महत्वाचे राजकीय पदे भुषविली त्या महिलांमध्ये सौ. सरिताताई गाखरे एक आहेत. त्यांचा जन्म नागपूर जिल्हयातील काटोल तालुक्याच्या कोल्हू गावात ५ एप्रिल १९८५ रोजी झाला. पुढे त्यांचा विवाह धर्ती–मुर्ती गावचे राजकारणी बहादूर विजय मनोहरराव गाखरे (महाजन) यांचेशी २२ मे २००३ रोजी झाला. त्यांनी आपले राजकारणी पती विजयरावांच्या जिल्हा परिषद मधील पराभवाचा वचपा काढण्याचा जोरदार प्रयत्न केला. अखेर सरिताताई गाखरे वर्धा जिल्हयातील कन्नमवार ग्राम गट क्र. ०५ (जिल्हा परिषद सर्कल) मधून ६३२२ मते घेवून प्रतिस्पर्धी उमेदवारावर इ.स. २०१७ मध्ये मात करीत दणदणीत विजय मिळविला. त्या तीन वर्षानंतर इ.स. २०२० मध्ये वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावर विराजमान झाल्या. सरितातांईनी २०१७ ते २०२२ पर्यंत अध्यक्ष पद सांभाळले. तेव्हा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या गंभीर समस्या त्यांना जाणवल्या. म्हणून अशा संकटग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याकरीता कारंजा तहसिल कार्यालयासमोर त्यांनी एल्गार केला. अवकाळी पाऊस आणि गारपीटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळावी, याकरीता वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री ना. सुनिल केदार यांना एक निवेदन दिले. स्वत: जबाबदारीने घेवून वर्धा जिल्हा अधिकारी कार्यालयात खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी विवेक भिमनवार, आमदार दादाराव केचे यांचे उपस्थितीत बैठक घेतली. याचवेळेस मध्यप्रदेशातून कोटयावधीच्या संख्येने आलेल्या किटकांमुळे आष्टी तालुक्यातील माणिकवाडा, तारासावंगा, साहूर या गावातील शेतीचे अतोनात नुकसान झाले. त्या शेतीची पाहाणी केली. व राज्याचे कृषी मंत्री ना. दादा भुसे यांचेशी आभासी बैठक घेवून जिल्हयातील शेतीच्या नुकसानीची माहिती दिली. लगेच आर्वी या तालुक्याच्या ठिकाणी उपविभागीय अधिकारी हरीष धार्मिक यांना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीची पाहणी करून पंचनामा सादर करण्यास सांगितले.*

*शेतकऱ्यांनी मोठया कष्टाने उत्पादित केलेल्या पिकांचे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन कृषी दिनी वर्धा जिल्हा परिषदेच्या सभागृहात सरिता ताईंनी भरविले. भारतीय शेतकऱ्यांनी आपले शेतात रब्बीची कोणती पिके घ्यावी यासाठी एक आढावा बैठक घेतली. ज्या शेतकऱ्यांनी कोरोना काळात जिवाची पर्वा न करता उत्पादन वाढविले अशा शेतकऱ्यांचा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा या नात्याने सरिता गाखरे यांनी सन्मान केला. अशाप्रकार सरितातांईच्या वर्धा जिल्हयातील कृषीविषयक कल्याणकारी कार्याचे सिंहावलोकन या शोधनिबंधाद्वारे घेण्याचा*

*मी प्रयत्न केलेला आहे.*

**बिजसंस्था (Keywords) :**

वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. सरिताताई गाखरे (महाजन) या महिलेच्या कोरोना आणि कोरोनोत्तर काळातील कृषी विषयक कल्याणकारी कार्याचे योगदान महत्वपूर्ण आहे.

---

**कालावधी (Period)** : या शोधनिबंधाचा कालावधी इ.स. २०२० ते २०२४ पर्यंत आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे (Objective of Research Paper) :**

१. शेतबांधावर जावून प्रत्यक्ष उध्वस्त शेतपिकाची पहाणी करणे.
२. कृषीदिनी शेतकरी पोशिंदयांचा सन्मान करणे.
३. तीन दिवशीय शेतकरी प्रदर्शनाचे आयोजन करणे.
४. शेतकऱ्यांना ऑनलाईन सातबाराचे वितरण.
५. शेतीविषयक मासिक प्रगती आढावा सभेचे आयोजन.
६. शेतीविषयक समस्यांचे निराकरण करण्यास कटीबध्द असल्याचे आश्वासन देणे.
७. कृषी मंत्र्यांसोबत पिक पध्दती विषयी आढावा बैठका घेणे.
८. कारंजा तालुक्यात शेतकऱ्यांसाठी आंदोलन करणे.
९. तीन दिवशीय शंकरपट महोत्सवाचे आयोजन करणे.

या उद्दीष्टांचे आधारे हा शोधनिबंध स्पष्टीकरणासह मी पुर्ण करणार आहे.

**गृहीतके (Hypothesis) :**

महाराष्ट्रामधील वर्धा जिल्हयातील महिलांचे कृषी विषयक कल्याणकारी कार्याचे ऐतिहासिक सिंहावलोकन महत्वपूर्ण आहे.

**संशोधन पध्दती (Research Methodology) :**

प्रस्तुत शोधनिबंध प्राथमिक आणि दुय्यम या साधन सामग्री वर आधारीत आहे. या शोधनिबंधाकरीता विविध संदर्भ ग्रंथे, नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट, स्मरणिका, मुलाखती या साधनांचे आधारे घेवून पुर्ण करण्यात येणार आहे. त्यामध्ये खालील मुद्दे आधारभूत राहील.

१. कारंजा (घाडगे) तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतीची पहाणी करणे.
२. जिल्हाधिकारी आणि तहसिलदारांना निवेदन देणे.
३. खर्डा येथील किसान सभेला मागदर्शन करणे.
४. विनय राजे यांचे निरोप समारंभाला उपस्थित राहणे.
५. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत कृषी योजना वळत्या करण्याचा ठराव पास करणे.
६. आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे सत्कार समारंभाला उपस्थिती.

या सर्व महत्वपूर्ण मुद्दयांचे आधारे स्पष्टीकरणासह हा शोधनिबंध पूर्ण केला जात आहे.

**प्रस्तावना (Introduction) :**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. या देशातील शेतकऱ्यांनी रात्रंदीन काबाडकष्ट करून मोठया प्रमाणावर पीके काढली, त्या पिकांना सरकारतर्फे भाव मिळत नाही म्हणून त्यांचेवर आत्महत्या करण्याची वेळ आली. अशा शेतकऱ्यांनी आंदोलनाचे माध्यमातून अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला.

त्या आंदोलनाची धुरा वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सरिता गाखरे यांनी आपले हाती घेतली. जागोजागी वर्धा जिल्हयामध्ये आंदोलने करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या महत्वपूर्ण कार्याची दखल या शोधनिबंधातून घेण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**कारंजा तहसिल कार्यालयासमोर भाजपाचा एल्गार :**

शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडणे व राज्य सरकारच्या धोरणाचा निषेध करण्याकरीता कारंजा (घाडगे) तहसिल कार्यालयासमोर आमदार दादाराव केचे यांचे सुचनेवरून वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष सरिता गाखरे यांचे नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. यावेळेस आंदोलन स्थळी कारंजा तालुक्यातील मुकुंदराव बारंगे, माजी उपसभापती मंगेश खवशी, हेमंत बन्नगरे, युवराज गिऱ्हाळे यांनी आघाडी सरकारचा निषेध केला. व लगेच तहसिलदार सचिन कुमावत यांना निवेदन दिले.

निवेदन देतेवेळी जि.प. सदस्य निता गजाम, रेवता धोटे, पं.स. सदस्य रोषणा ढोबाळे तसेच उषा घागरे, किशोर ढोले, संदीप चोपडे, विजय गाखरे, चक्रधर डोंगरे, मोहन चौधरी, हरीभाऊ चौधरी, निखील धंडाळे, संजय बन्नगरे व तालुक्यातील शेतकरी महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**सरिता गाखरे यांच्या उपस्थितीत पालकमंत्र्यांना निवेदन :**

अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतपिकांचे नुकसान झाले. त्या शेतकऱ्यांना मदत मिळण्याकरीता जि. प. अध्यक्षा सरिता गाखरे यांनी वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री सुनिल केदार यांना एक निवेदन दिले. आर्वी विधानसभा अंतर्गत येणाऱ्या आष्टी, आर्वी, कारंजा (घाडगे) तालुक्यात गहु, चना, भाजीपाला, फळे जमीनदोस्त झाली. शेतकरी नैराश्येच्या अवस्थेत होते. अशा शेतकऱ्यांचे पंचनामे करून तातडीने शेतकऱ्यांना मदत मिळणे गरजेचे असल्याचे सरिता गाखरे यांनी निवेदनात नमुद केले.

**खरीप पीक आढावा बैठक :**

इ.स. २०२० च्या कोरोनामुळे देशाची आर्थिक स्थिती बदललली अशा संकटकाळात शेतीची पीक पध्दती बदलणेही गरजेचे आहे. लवकरच येणारे वाण बाजारात उपलब्ध व्हावे याकरीता वर्धेचे जिल्हाधिकारी कार्यालयात खरीप पीक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीला राज्याचे दुग्ध व्यवसाय व जिल्हयाचे पालकमंत्री ना. सुनिल केदार तसेच वर्धा जि.प. च्या अध्यक्षा सरिता गाखरे उपस्थित होत्या. बैठकीला खासदार रामदास तडस, आमदार डॉ. पंकज भोयर, रणजित कांबळे, दादाराव केचे, समीर कुणावार व जिल्हाधिकारी विवेक भिमनवार उपस्थित होते.

**नुकसान झालेल्या शेतपिकांची पहाणी :**

आष्टी तालुक्यामध्ये अचानक मध्यप्रदेशातून किटकांनी माणिकवाडा, साहूर, तारासावंगा, वडाळा, द्रुगवाडा परिसरात थैमान घातले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पीक उध्वस्त झाले. त्या पिकांची आमदार दादाराव केचे आणि जि.प. अध्यक्षा सरिता गाखरे यांनी पहाणी केली. व लगेच उपविभागीय कृषी अधिकारी एस.के. सांगळे व तालुका कृषी अधिकारी एम.जे. तोडकर यांचेशी संपर्क साधून तात्काळ सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले.

**कृषी मंत्री दादा भुसे यांचेसोबत आभासी बैठक :**

खरीप हंगामाकरीता जिल्हयातील बॅका शेतकऱ्यांना कर्ज वाटप करते. त्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट १ हजार २९ कोटी रूपयाचे असतांना बँकांनी केवळ ३७ कोटी रूपये कर्ज वाटप केले. याकरीता जिल्हाधिकाऱ्यांनी आठवडयातून दोनदा बँकांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलवावी, व केलेल्या कर्ज वाटपाचा आढावा घ्यावा अशी

विनंती सरिता गाखरे यांनी कृषी मंत्री दादा भुसे यांचेकडे व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे उपस्थित होते.

**शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याकरीता आर्वीत बैठक :**

खरीप हंगाम सुरू होवूनही कर्ज वाटपाची प्रक्रीया गतीने राबविली जात नसल्याच्या अनेक तक्रारी सरिता गाखरे यांचेकडे आल्या. या तक्रारीवर प्रशासनाने त्वरीत निर्णय घेवून शेतकऱ्यांना तातडीने पीककर्ज उपलब्ध करून दयावे असे निर्देश जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष सरिता गाखरे यांनी दिले. आर्वी नगर परिषदेच्या बैठकीतून दिले.

बैठकीला आर्वी नगर परिषदेचे अध्यक्ष प्रशांत सव्वालाखे, उपविभागीय अधिकारी हरीष धार्मिक, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी तृप्ती जाधव, तहसिलदार विद्यासागर चव्हाण, नगराधिकारी विद्याधर अंधारे, कारंजाचे तहसिलदार कुमावत, आष्टीचे तहसिलदार वानखडे उपस्थित होते आष्टी.

**कारंजा तालुक्यातील अतिवृष्टीने झालेल्या शेत नुकसानीची पहाणी :**

कारंजा (घा.) तालुक्यातील नारा जिल्हा परिषद सर्कल, सारवाडी सर्कल, पं.स. ठाणेगाव सर्कल मधील सर्व मौजांमध्ये १४ जुन २०२० रोजी झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या शेतातील जमीन खरडून गेली. अशा जमिनीची पाहणी जिल्हा परिषद अध्यक्ष सरिता गाखरे यांनी केली. त्वरीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी उपाययोजना कराव्या असे तहसिलदार कुमावत यांना सांगितले. शेत नुकसान पाहणी वेळी आमदार दादाराव केचे, कारंजा येथील मुकुंदराव बारंगे, काकडा गावाचे सरपंच अन्ना धंडाळे, माजी सरपंच शिवकुमार उघडे, भोजराज उघडे उपस्थित होते.

**भिडी येथील शेतकऱ्यांशी संवाद :**

कृषी संजीवनी सप्ताहा निमित्त कृषी मंत्री दादा भुसे यांनी वर्धा जिल्हयातील भिंडी येथील शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यानंतर लवकरच जिल्हा परिषद सभागृहामध्ये आढावा बैठकीचे आयोजन केले. बैठकीला वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष सरिता गाखरे, जिल्हाधिकारी विवेक भिमनवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. सचिन ओम्बासे उपस्थित होते. बैठकीत जुलै अखेर कर्जवाटपाचे उद्दिष्ट पुर्ण करण्यास अधिकाऱ्यांना सांगण्यात आले.

**सरिता गाखरे खर्डा येथील किसान सभेच्या मार्गदर्शक :**

देवळी तालुक्यातील किसान आघाडीच्या वतीने खर्डा येथे किसान सभेचे आयोजन करण्यात आले. सभेच्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सरिता गाखरे प्रमुख मार्गदर्शिका म्हणून उपस्थित होत्या. सभेचे उद्घाटक म्हणून खासदार तडस होते. सभेचे अध्यक्षपद डॉ. शिरीष गोडे यांनी भुषविले. शेतकऱ्यांच्या मालाची किंमत समजून न घेता त्या मालाची खरेदी दलाल आपल्या मन मर्जीनुसार त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. सभेत सरिता गाखरे यांनी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी मोदी सरकारने केली असल्याचे सांगितले. या सभेला सुधीर दिवे उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक जि.प. सदस्य मुकेश भिसे यांनी, तर आभार महेश भिसे यांनी मानले.

**राज्यस्तरीय पीक स्पर्धेचे उद्घाटन :**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा जन्मदीन कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. त्या दिवशी वर्धा जिल्हा परिषदेच्या सभागृहात राज्यस्तरीय पीक स्पर्धेचे विधीवत आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सरिता गाखरे यांनी केले. स्पर्धेला मुख्य कार्यपालन अधिकारी डॉ.

सचिन ओम्बासे, जि.प. उपाध्यक्ष वैशाली येरावार, जिल्हा कृषी अधिक्षक अनिल इंगळे, कृषी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष रवि शेंडे उपस्थित होते.

**शेतकरी समस्यांचे निराकरण करण्यास कटीबध्द असल्याचे आश्वासन :**

वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांसमोर अनेक समस्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी वर्धा जिल्हा परिषद तत्पर आहे. असे आश्वासन सरिता गाखरे यांनी १२ जाने. २०२१ रोजी दिले. याप्रसंगी आमदार दादाराव केचे आणि सरिता गाखरे यांनी आजदा, जळगाव, पिंपळखुटा, सोरटा, सुकळी उमरी कोल्हापूरी बंधाऱ्याचे भूमीपुजन केले.

**खरीप आढावा बैठकीला उपस्थिती :**

कोरोना आजारामुळे देशाची आर्थिक स्थिती बदललेली आहे. अशा वेळी शेतीची पीक पध्दती बदलणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त पीक काढता यावे यासाठी जिल्हयाच्या सिंचनक्षेत्रात वाढ करावी. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून बॅरेज कम बंधाऱ्याची कामे पूर्ण करावी याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात पीक आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला जि.प. अध्यक्षा सरिता गाखरे, पालकमंत्री सुनिल केदार, खासदार रामदास तडस, आमदार दादाराव केचे, डॉ. पंकज भोयर, समीर कुणावार, रणजीत कांबळे, जिल्हाधिकारी विवेक भिमनवार, मुख्य कार्यपालन अधिकारी, डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा कृषी अधिकारी अनिल इंगळे बैठकीत उपस्थित होते.

कापसाच्या बी.जी. ३ वाणाची जिल्हयात अवैध विक्री करणाऱ्या कृषी केंद्रावर धाडी टाकाव्या अशा सुचना जि.प. अध्यक्ष सरिता गाखरे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

**विनय राजे यांचे निरोप समारंभाला उपस्थिती :**

नोकरी निमित्ताने अनेक माणसे शहरात येतात आणि निघून जातात. परंतु कुणाला हक्काने आपले म्हणावे असे ऋणानुबंध तयार करणारे लोक फारच कमी असतात. त्यामध्ये विनय राजे एक आहेत. वर्धा येथील ब्राम्हण सभा व सोशल इंडिया शास्त्री फोरमच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा अर्बन को–ऑपरेटीव्ह सोसायटीचे विभागीय व्यवस्थापक विनय राजे यांचा निरोप समारंभ ५ जुन २०२१ रोजी आयोजीत करण्यात आला. या समारंभाला जिल्हा परिषद अध्यक्ष सरिता गाखरे, जेष्ठ उद्योजक मोहन बाबु अग्रवाल, ब्राम्हण सभेचे जिल्हाध्यक्ष विलास कुळकर्णी, ऑल इंडिया शास्त्री फोरमचे राज्य उपाध्यक्ष इमरान राही उपस्थित होते. यावेळी विनय राजे यांचा शाल श्रीफळ आणि सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

या समारंभात सरिता गाखरे यांनी आपल्या पदाचा कार्यभार सांभाळून विनय राजे यांनी सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात अभिनंदनीय कार्य केले असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इमरान राही, सूत्र संचालन विलास कुळकर्णी तर आभार हरीष तांदळे यांनी मानले.

**मासिक प्रगती अहवाल आढावा सभेचे आयोजन :**

देवळी पंचायत समितीचे सभागृहात १८ जुन २०२१ रोजी मासिक प्रगती अहवाल संबंधी आढावा सभा आयोजित करण्यात आली. वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सरिता गाखरे यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. सभेला जि.प. च्या उपाध्यक्ष वैशाली येरावार, उपमुख्यकार्यपालन अधिकारी विपूल जाधव, देवळी पंचायत समितीच्या सभापती कुसुम चौधरी उपस्थित होत्या. त्यांचे समक्ष विविध विभागांनी स्वच्छ भारत मिशन योजनेबाबत आपला आढावा सादर केला. यावेळेस किती लोकांची कामे पूर्ण झाली आणि किती लोकांची अपूर्ण आहेत यासंबंधीचा संपूर्ण अहवाल जि.प. अध्यक्षा सरिता गाखरे यांनी जाणून घेतला.

**कोरोना काळातील पीक स्पर्धक शेतकऱ्यांचा सन्मान :**

राज्य शासनाचे वतीने आयोजीत करण्यात आलेल्या पीक स्पर्धेत जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला. अशा शेतकऱ्यांचा वर्धा जिल्हा परिषदेच्या सभागृहात १ जुलै २०२१ रोजी जि.प. च्या अध्यक्ष सरिता गाखरे यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. त्यामध्ये राज्यस्तरीय पीक स्पर्धेत आदीवासी गटातून गव्हाचे सर्वात जास्त उत्पादन घेणारे सुधाकर कुंभरे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. सर्वसाधारण गटात हरभरा पिकाचे उत्पादनात दुसरा क्रमांक सुरेश चेके यांनी मिळविला. विभाग स्तरावर सर्वसाधारण गटामध्ये गहु उत्पादनात बाजी मारणाऱ्या कल्पना सोमनाथे, अमोल डबले, मारोती हिंगे, विठ्ठल लोखंडे या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जि.प. च्या उपाध्यक्ष वैशाली येरावार, सभापती सरस्वती मडावी, मृणाल माटे, विजय आगलावे उपस्थित होते.

**शेतकऱ्यांसाठी सर्वसाधारण सभेत योजना वळत्या करण्यासाठी ठराव :**

वर्धा जिल्हयात पाच एकराचे आत शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी सबसिडी लाभ देण्यात येतो. परंतु पाच एकरावरील शेतकऱ्यांना कुठलाही लाभ मिळत नाही. त्यामुळे इच्छुक सर्व शेतकऱ्यांना सबसिडीचा लाभ मिळावा याकरीता जि.प. च्या सर्वसाधारण सभेत एक ठराव सरिता गाखरे यांचे उपस्थितीत मंजुर करण्यात आला. जिल्हा परिषदेतील कृषी अधिकाऱ्याकडे असणाऱ्या सर्व योजना जिल्हा परिषदेकडे वळत्या कराव्या. यासाठी विशेष ठराव घेण्यात आला.

याकरीता जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा २५ जुन २०२१ रोजी जि.प. अध्यक्ष सरिता गाखरे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला उपाध्यक्ष वैशाली येरावार, सभापती माधव चंदनखेडे, विजय आगलावे, मृणाल माटे, सरस्वती मडावी हे सभापती व मुख्य लेखा वित्त अधिकारी सदाशिव शेळके उपस्थित होते. पिकांच्या नुकसानीचा सर्व्हे करतांना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्याबाबतच्या सूचना सर्व तालुका कृषी अधिकाऱ्यांना जि.प. च्या अध्यक्ष सरिता गाखरे यांनी दिल्या.

**आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सत्कार समारंभाला उपस्थिती :**

जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयाचे कामकाज मागील अनेक वर्षापासून किरायाच्या इमारतीमध्ये चालत होते. कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नव्हती. त्यामुळे जास्तीच्या अडचणी भासत होत्या. त्याचा त्रास शेतकरी, अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहन करावा लागला. ही अडचण समजून वर्धेचे आमदार डॉ. पंकज भोयर यांनी जिल्हा कृषी कार्यालयाच्या इमारतीबाबत सरकारकडे सतत पाठपुरावा केला म्हणून तत्कालीन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भरघोस निधी मंजुर केला. वर्धा येथील जिल्हाधिकारी कार्यालय मार्गावर ६८७५ चौ.फुट जागेवर जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयाची इमारत ६८७५ चौ.फुट जागेवर आकारास आली. त्याबद्दल सुधीर मुनगंटीवार यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभाला खासदार रामदास तडस, जि.प. अध्यक्ष सरिता गाखरे, माजी आदीवासी विकासमंत्री अशोक उईके, रामदास आंबटकर, दादाराव केचे, समीर कुणावार उपस्थित होते.

**शेतकरी आणि शेतमजुरांच्या समस्या शेत बांधावर जावून जाणल्या :**

वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष सरिता गाखरे यांनी कारंजा तालुक्यातील धर्ती गावच्या शेतामध्ये ऑगस्ट २०२१ ला शेतकरी व शेतमजुरांच्या समस्या शेतबांधावर जावून घेतल्या. निसगाच्या प्रकोपामुळे शेतकरी किती अडचणीत आहे. त्याच्या तोंडचा घास पळून जाण्याची परिस्थिती आहे. शेतकरी हा पूर्णपणे चिंतातूर असल्याचे सरिता गाखरे यांना आढळून आले. त्यांनी सासुबाई चंद्रकला मनोहरराव गाखरे, शेतमजुर

पिंगला धारपुरे, सविता पेंदे, उज्ज्वला शेंडे, उषा लाडेकर, संगीता गाडरे, चंदा बडत, कल्पना गजभे, सुनिता रबडे यांचेशी संवाद साधला व सर्व अडचणी समजून घेतल्या.

**शेतबांधावर जावून रोगग्रस्त सोयाबीनची पाहणी :**

कारंजा तालुक्यातील सारवाडी, नागलवाडी, बोरी, पालोरा, मोर्शी, खरसखांडा, ठाणेगांव व बोरी शिवारातील रोगग्रस्त सोयाबीनची शेतकऱ्यांच्या बांधावर जावून सरिता गाखरे यांनी पाहणी केली. खोडमाशी सोबतच मुळकुंज, करपा, तांबेरा रोगामुळे सोयाबीनचे १०० टक्के नुकसान झाले. यामुळे बैलपोळयाच्या सणात शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली. या घटनेची माहिती ताबडतोब राज्याचे कृषीमंत्री दादा भुसे यांना पोहोचवावी अशा सुचना जि.प. अध्यक्षा सरिता गाखरे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. भविष्यात शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होवू नये म्हणून महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांनी पारंपारीक पिकांच्या वाणांचे संशोधन करण्याची सरिता गाखरे यांनी अपेक्षा केली. यावेळेस आर्वीचे आमदार दादाराव केचे, मुकुंद बारंगे, विवेक डोबले, सुनिल डोंगरे, अंबादास मानमोडे, ईश्वर हिंगवे आदींची उपस्थिती होती.

**शेतकऱ्यांना ऑनलाईन सातबाराचे घरपोच वितरण :**

प्रत्येक शेतकऱ्याला सातबारा करीता तलाठयाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहावे लागते. यामुळे अनेक अडचणी येतात, त्या अडचणी दुर करण्याकरीता ऑनलाईन सातबारा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देत असल्याचे जि.प. अध्यक्षा सरिता गाखरे यांनी सांगितले. शेतकऱ्यांपर्यंत सातबारा पोहोचविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे असे वर्धेच्या जिल्हाधिकारी प्रेरणा देशभ्रतार यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयातून ऑनलाईन सातबारा देण्याचा श्रीगणेशा सरिता गाखरे यांनी केला. सातबाराचे वाचन करून त्यामध्ये काही चुका आढळल्यास त्या दुरूस्त करण्यासाठी तलाठयांनी सहकार्य करावे असे सरिता गाखरे यांनी निर्देश दिले.

**तीन दिवशीय शेतकरी प्रदर्शनीला उपस्थिती :**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आत्माचे वतीने सेवाग्राम मार्गावरील चरख पॉईंट परिसरात तीन दिवशीय शाश्वत शेती तंत्रज्ञानाचे व शेतकरी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनीचे उद्घाटन वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री सुनिल केदार यांनी केले. यावेळी जि.प. अध्यक्ष सरिता गाखरे, उपाध्यक्ष वैशाली येरावार, जिल्हाधिकारी प्रेरणा देशभ्रतार, जि.प. चे मुख्य कार्यपालन अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा कृषी अधिकारी अनिल इंगळे, आत्म्याच्या प्रकल्प संचालक विद्या मानकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

या प्रदर्शनी प्रसंगी सरिता गाखरे यांनी मार्गदर्शन केले. दुग्ध व्यवस्थापन व परसबागेतील कुक्कुट पालन, शेळी पालन, मधु मक्षिका पालन योजना, पीकविमा, कृषी पायाभूत सुविधा, निधी योजना या विषयांवर अनेक मान्यवरांची व्याख्याने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विद्या मानकर यांनी तर उपस्थितांचे आभार उपविभागीय कृषी अधिकारी अजय राऊत यांनी मानले.

**शेतकरी सन्मान दिनी पोशिंद्याचा सन्मान :**

देशाच्या सर्वांगीण विकासाचा कणा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या कामाची किंमत व्हावी म्हणून राष्ट्रीय किसान दिवसाचे औचित्य साधून प्रजापीता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय आणि रिसर्च फाउंडेशन ग्रामविकास प्रभागातर्फे सामाजिक न्याय भवन येथे शेतकरी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात परिसरातील जैवीक शेती करणाऱ्या सावित्री अनंता, धीरज भोयर, धनंजय अग्रवाल, शालीग्राम चापले, सावित्री येळणे यांचा जि.प. अध्यक्ष सरिता गाखरे यांचे हस्ते शाल श्रीफळ देवून सन्मान करण्यात

आला. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून महेन्द्र ठाकुर उपस्थित होते. व्यासपिठावर समाजकलयाण विभागाचे उपायुक्त एस.एम. चव्हाण, कृषी संचालक संजय हाडके उपस्थित होते. संचालन बी.के. अर्पणा, तर आभार अविनाश यांनी मानले.

**शेत बांधावर जावून उध्वस्त पिकांची प्रत्यक्ष पहाणी :**

कारंजा (घा.) तालुक्यात ८ जानेवारी २०२२ ला अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळयात अश्रु आले. सेलगाव (लवणे), धर्ती, बोरी, ठाणेगाव, राजनी, नारा, सावरडोह, बेलगाव, सारवाडी, सुसुंद्रा, पार्डी, बोंदरठाणा, चिंचोली, कन्नमवार ग्राम, हेटीकुंडी, बांगडापुर अशा १९ गावांमध्ये हाहाकार माजला. या संपूर्ण गावांमध्ये जि.प. अध्यक्ष सरिता गाखरे आणि आर्वीचे आमदार दादाराव केचे यांचेसह शेत बांधावर जावून नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. तालुक्यातील ७२८ हेक्टरवरील पीके उध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांच्या हालाला पारावार राहीला नाही. गहु, चना, कापूस, तुर, भाजीपाला, संत्रा फळपीकांचे अतोनात नुकसान झाले. अशा शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा तडकाफडकी करण्याचा आदेश सरिता गाखरे यांनी दिला. यावेळी तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने, मंडळ अधिकारी प्रदीप ताकसांडे, मुकुंदराव बारंगे, हनुमंतराव पठाडे उपस्थित होते.

या पावसाची झळ वर्धा जिल्हयातील आठही तालुक्यातील गावांना पोहोचली. शेत पिकांसह रस्ते, पुल, तलाव, विहीर यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. अनेक घरांची पडझड झाली. तसेच उमरी येथील तलाव येनगाव—पिपरी रस्त्यावरील पुल, जसापूर जवळील पुल खचले. या नुकसानीची सरिता गाखरे यांनी पाहणी केली असता पंचनामे करावयास सांगितले. कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी सवलतीपासून वंचित राहू नये असा तहसिलदार ऐश्वर्या गिरी यांना आमदार दादाराव केचे यांनी आदेश दिला.

शेत पिकांची पाहणी करतेवेळेस कारंजा तालुक्यातील भाजपा तालुकाध्यक्ष मुकुंदा बारंगे, हरीभाऊ धोटे, सुरेश खवशी, मंगेश खवशी, दिनेश ढोबाळे, रोशना ढोबाळे, हनुमंत पठाडे व संबंधित गावचे सरपंच ग्रामस्थ उपस्थित होते.

**विज तोडणी थांबविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन :**

अतिवृष्टीमुळे इ.स. २०२० मध्ये शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. त्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे होवूनही त्यांना मदत मिळाली नाही. याउलट शेतकऱ्यांची विद्युत जोडाी कापण्यात आली. ती विज जोडणी तोडण्याचे काम थांबवावे अशी मागणी वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सरिता गाखरे यांनी केले.

यासंबंधी सरिता गाखरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनातून मागणी केली. एकीकडे अद्यापही रक्कम प्राप्त न झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले तर दुसरीकडे पैशा अभावी विद्युत देयक थकल्याने महावितरण कडून कृषी पंपाची जोडणी तोडत आहे. याविरूध्द सरिता गाखरे यांनी आवाज उठविला. व लगेच विधानसभेचे आमदार समीर कुणावार, खासदार रामदास तडस, आमदार दादाराव केचे यांचे उपस्थितीत वर्धेच्या जिल्हाधिकारी प्रेरणा देशभ्रतार यांना निवेदन दिले.

**सार्शी—मोर्शी तलावातील गाळ काढण्याच्या शुभारंभाच्या अतिथी :**

कारंजा (घा.) तालुक्यातील सार्शी—मोर्शी ग्रामपंचायत अंतर्गत एक तलाव आहे. तलावातील पाण्याचा सार्शी—मोर्शीसह हेटीकुंडी, खरसखांडा, ठाणेगाव या गावातील शेतकऱ्यांना फायदा होतो. या तलावात गाळ साचल्याने पाण्याची साठवणूक क्षमता कमी झाली आहे. शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. म्हणून सार्शी—मोर्शी गावातील नागरीकांच्या मागणीनुसार दहा टक्के लोहसहभागातून जमनालाल बजाज

सेवा ट्रस्टने या तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेतले. या कामाचा शुभारंभ वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष सरिता गाखरे यांनी केला. याप्रसंगी जमनालाल बजाज सेवा ट्रस्टचे मुख्य कार्याधिकारी संजय भार्गव, विजय गाखरे, मोर्शीचे सरपंच नामदेव देवासे, अशोक गोहते, दिनेश ढोबाळे उपस्थित होते.

**नवनिर्वाचीत बाजार समिती संचालकांचा सत्कार :**

आर्वी, आष्टी, कारंजा (घा.) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत नवनिर्वाचीत संचालकांचा सत्कार १३ मे २०२३ रोजी लक्ष्मणराव मानकर सभागृह आर्वी येथे आयोजीत करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार रामदास तडस यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार दादाराव केचे होते. हा कार्यक्रम भाजपा प्रदेश सचिव सरिता गाखरे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. आर्वी बाजार समितीतील नवनिर्वाचीत संचालक संदीप काळे, विजय गुल्हाने, गजानन जवळेकर, गजानन निकम, भीमराव कुराडे, शिरीष महल्ले, प्रज्वल कांडलकर, प्रशांत वानखडे, शोभा काळे, गायत्री बोके, मधुकर चौकोने, बाळा सोनटक्के, मंगेश मानकर, चेतन टावरी, लखन अग्रवाल, दिलीप भुसारी, आष्टी, कारंजा कृ.उ.बा. समितीतील नवनिर्वाचीत संचालक भुपेश बारंगे, रेवता बाई धोटे, विष्णू धोंगडी या संचालकांचा सत्कार करण्यात आला.

**कृषी महोत्सव कार्यक्रमाला उपस्थिती :**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा व कृषी विभाग वर्धा, तालुका कृषी कार्यालय कारंजा (घा.) यांच्या संयुक्त विद्यमाने गोळीबार चौक कारंजा (घा.) उड्डाण पुलाखाली कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कृषी महोत्सवाचे उद्घाटन आमदार दादाराव केचे यांच्या हस्ते यावेळी भाजपा प्रदेश सचिव सरिता गाखरे उपस्थित होत्या. कृषी महोत्सवात तालुक्यातील ४०० ते ५०० शेतकरी, महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी यांनी भेटी देवून कृषी विषयी माहिती जाणून घेतली. कृषी महोत्सवाचे यशस्वीतेकरीता कृषी विभाग व आत्मा अधिकारी कर्मचारी यांनीही मोलाचे सहकार्य केले.

**खासदार क्रिडा महोत्सवांतर्गत शंकरपटाचे आयोजन :**

खासदार क्रिडा महोत्सव २०२४ अंतर्गत स्व. मोरेश्वर भांगे यांचे स्मृती प्रित्यर्थ भव्य शंकरपटाचे आयोजन २२ फेब्रु. २०२४ रोजी कारंजा (घा.) येथे करण्यात आले. भव्य शंकरपटाचे उद्घाटन वर्धेचे खासदार रामदास तडस यांचे हस्ते झाले. या सोहळयाचे अध्यक्षपद आर्वी विधानसभेचे आमदार दादाराव केचे यांनी भुषविले. उद्घाटन प्रसंगी भाजपा प्रदेश सचिव सरिता गाखरे सुरेश खवशी, चक्रधर डोंगरे, मंगेश खवशी उपस्थित होते. या सोहळयात कारंजा आणि लगतच्या परिसरातील नागरिकांनी शंकरपटाचा प्रत्यक्ष थरार अनुभवला. शंकरपटात एकूण १५० पेक्षा अधिक बैलजोडया सहभागी झाल्या.

**तीन दिवशीय शंकरपट महोत्सवाचे बक्षीस वितरण :**

संत लटारे महाराज शेतकरी शंकरपट समिती कारंजा (घा.) व नितीन गडकरी सेवा फाउंडेशनच्या वतीने स्व. शांताराम ढबाळे व स्व. मयुर चापले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजीत शंकरपट महोत्सवाचे उद्घाटन खासदार रामदास तडस यांनी केले. यावेळी वर्धा जि.प. माजी अध्यक्ष सरिता गाखरे यांची उपस्थिती होती. सरकारी आय.टी.आय. च्या मागे अजाब भोकरे यांच्या शेतात आयोजीत महोत्सवाचे १/३/२०२३ ला उद्घाटन झाले. प्रास्ताविक आयोजन समितीचे अध्यक्ष शिरीष भांगे, तर संचालन राणा बावरी यांनी केले.

खासदार क्रिडा व सांस्कृतीक महोत्सवात शंकरपट स्पर्धेत रामलखन, मेजर वाहया या बैलजोडयांसह अनेक जोडयांनी पटाचा थरार प्रेक्षकांना दाखविला. शंकरपटातील अ गटात मध्यप्रदेशातील बैतूलच्या आरीज पटेलचा बेरिया–डोबरीया ७.१४ सेकंदात, ब गटात बैतुलच्याच रामप्रसाद राठोडचा बादशाह सुल्तान, ७.१४

सेकंदात व तहसिल गटात गारपीटच्या गोपाल जाधवचा कन्हैय्या साई ७.९० सेकंदात १०० फुट अंतर पार केले. या बैलजोडया पहिल्या क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. चषक, सन्मानचिन्ह प्रमाणपत्र, रोख बक्षीस देवून विजेत्यांना यावेळी सरिता गाखरे यांचे हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धेत ११३ बैलजोडया धावल्या.

सामान्य अ गटात मोहन पाटील चव्हाण (संभाजीनगर) यांच्या लखन आणि जलवा या जोडीने ६.९२ सेकंदात शर्यत संपवून प्रथम क्रमांक पटकाविला. अतिश वर्मा (वाशिम) यांच्या राणा लक्ष ७.६ सेकंदात दुसरा क्रमांक, तिसरा क्रमांक घारपळ येथील बजरंग बंशी, हिवरा येथील सिकंदरा–वीरा, जालना येथील बलमा–नध्या, सोनेगाव येथील बारूद–बक्या, कारंजा येथील निखील देवासे, पिपरी येथील शिवालखन जोडी विजेत्या राहील्या. कार्यक्रमाचे आभार मंगेश खवशी यांनी मानले.

**तालुकास्तरीय कृषी महोत्सवाचे उद्‌घाटन :**

भारताचे माजी कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती आणि आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष निमित्ताने मॉडेल हायस्कूल कारंजा (घा.) च्या प्रांगणात कृषी महोत्सवाचे आयोजन तालुका कृषी कार्यालया मार्फत करण्यात आले. या महोत्सवाचे उद्‌घाटन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सरीता गाखरे यांनी केले. महोत्सवाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कृषी अधिकारी प्रभाकर शिवणकर, उपविभागीय कृषी अधिकारी प्रियंका धवार, माजी जिल्हा परिषद सदस्य भाऊसाहेब खवशी, कृषी विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

कृषी महोत्सवाला नागपूर विभागीय कृषी सहसंचालक मिलींद शेंडे यांनी भेट देवून पाहणी केली. विविध शासकीय विभाग, कृषी निविष्टा व औजारे, विविध गटांनी उत्पादीत केलेला प्रक्रीया युक्त पदार्थ, भाजीपाला, धान्य, फळे यांचे स्टॉल लावण्यात आले होते. शेतकरी ग्राहक ते थेट बाजारपेठांविषयीचे मार्गदर्शन यावेळेस शेतकऱ्यांना मिळाले. कृषी महोत्सवाला तालुक्यातील विविध गावातील अनेक शेतकरी, महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी यांनी एकच गर्दी केली.

**निष्कर्ष (Conclusion) :**

संततधार पावसामुळे महाराष्ट्रात हाहाकार उडाला, त्याची झळ वर्धा जिल्हयालाही पोहोचली. जिल्हयातील आठ तालुक्यातील शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. अशा शेतीची पहाणी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष या नात्याने सरिता गाखरे यांनी केली व अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे सादर करण्याचे आदेश दिले. सेलगाव (लवणे), धर्ती, बोरी, हेटीकुंडी, राजनी, ठाणेगाव, नारा, सावरडोह (बेलगांव), सारवाडी, सुसुन्द्रा, पार्डी, बोंदरठाणा, चिंचोली, कन्नमवार ग्राम, बांगडापूर, जसापूर, उमरी, येणगाव, पिपरी येथील अनेक घरांची पडझड झाली आणि तलावांचेही मोठया प्रमाणात नुकसान झाले. त्या नुकसानीची पाहणी करण्याकरीता सरिता गाखरे अधिकाऱ्यांसह शेतबांधावर पोहोचल्या. शेतकऱ्यांना कर्जवाटप प्रक्रीया गतीने राबविल्या जात नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी ऐकल्या. या तक्रारीचे निवारण करण्याकरीता आर्वी नगर परिषदेच्या सभागृहात तात्काळ बैठक बोलाविली व तातडीने गरजू शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यास अधिकाऱ्यांना सांगितले. त्या एवढयावरच थांबल्या नाही तर शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी म्हणून जिल्हयाचे पालकमंत्री सुनील केदार, कृषी मंत्री दादा भुसे यांना निवेदन दिले. अशाप्रकारे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष या नात्याने इ.स. २०२० ते २०२४ या कालावधीत विविध प्रकारच्या सवलती शेतकऱ्यांना मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे या शोध निबंधातून मी निष्कर्ष काढलेले आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- दै. सकाळ, तरूण भारत, २६/२/२०२०
- देशोन्नती, ४/८/२०२०, २२/४/२०२०, १/७/२०२०, ३/७/२०२०, ७/७/२०२०, १७/७/२०२०, १८/७/२०२०
- पुण्यनगरी, तरूणभारत ४/११/२०२०, २१/१/२०२१, १३/१/२०२१
- लोकमत २२/४/२०२१
- देशोन्नती, तरूण भारत ८/५/२०२१
- हितवाद १४/२/२०२१
- सकाळ, २१/७/२०२१
- देशोन्नती, तरूण भारत २/७/२०२१, २६/६/२०२१, १७/८/२०२१, २७/८/२०२१, १९/९/२०२१, ११/९/२०२१
- युवाराष्ट्र ४/१०/२०२१, देशोन्नती ६/९/२०२१ लोकमत समाचार ६/१०/२०२१, तरूण भारत ८/१०/२०२१ नवभारत, नवराष्ट्र ९/१०/२०२१
- लोकमत, देशोन्नती, तरूण भारत १९/१०/२०२१
- हितवाद २२/१०/२०२१
- तरूण भारत २६/१२/२०२१, लोकमत २७/१२/२०२१
- देशोन्नती १२/१/२०२२
- दौरा दैनंदिनी, लॉग बुक, जिल्हा परिषद वर्धा
- Search Google Internet
- प्रत्यक्ष मुलाखत १७/७/२०२४ सौ. सरिता विजय गाखरे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष वर्धा